भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०३/२०१७

१) संगनमत करुन अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २५/०२/२०१७ चे १२.०० ते १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अल्पवयीन मुलगी ही शेताचे कामावर पायी जात असतांनी आरोपी क्र. ०१ हा तिचे जवळ येवुन तिला पैशाचे आमिष दाखवुन सोबत येण्याबाबत विचारले परंतु फिर्यादी ने सोबत जाण्यास नकार दिला असता आरोपी क्र. ०१ याने आरोपी क्र. ०५ चे मदतीने फिर्यादीचे तोंड दाबुन जबरदस्तीने मोटार सायकल वर बसवुन पिंपळगाव रोडने झाडीझुडपात नेले त्याचे मागे आरोपी क्र. २+३+४ हे मोटार सायकलवर तिबलसीट बसुन आले व ०५ ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची व तिचे घर जाळण्याची धमकी देवुन अत्याचार केला व घटणेची मोबाईल मध्ये व्हीडीओ शुटींग करुन सदर व्हीडीओ प्रसारित केला व फिर्यादीस लाखांदुर येथे पोहचवुन निघुन गेले अशा फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६(ड),३६३,५०६(ब) भादंवि. सहकलम ४,६ लैगिंक अपराधापासुण बालाकांचे संरक्षण अधिनियम २०१२ सहकलम ४३,६७(ब)माहिती तंत्र. अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ढोबळे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) घराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन नगदी पैश्याची व चांदीचा साहीत्याची चोरी. :–

दिनांक ११/०३/२०१७ चे १९.०० ते १२/०३/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हरीचंद्र तुळशीराम परशुरामकर वय ७२ वर्ष, रा. खाडीपार पो.स्टे डुग्गीपार ह. मु. जमनापुर हा होळी सणानिमित्याने आपले घराचा ताला लावुन बाहेर गावी गेला असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन कपाटात ठेवलेले नगदी ५,५००/–रु. तसेच घरा शेजारील गणेश हिरामण कुंभरे यांचे घरचे चांदीचा करंडा, चांदीचा सिक्का, नगदी १७००/–रु. चा माल असा एकुण २७००/–रु. चा माल दोन्ही ठिकाणचा एकुण माल मिळुन असा एकुण ८२००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

३) घराचे दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन पर्समधुन पैशाची चोरी . :–

दिनांक १०/०३/२०१७ चे ०१.०० ते ११/०३/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती दिलाबाई वामनराव बडोले वय ६३ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली ही आपले मुलीकडे औषधोपचारा करीता आपले घराचे दाराला कुलुप लावुन गेली असता व आज रोजी मुलगी कुमुद हिचे सोबत सना निमीत्त घरी आली असता तीचे घराचे समोरील दाराचे कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन कुलुप तोडुन आत प्रवेश करुन मीनी पर्स मधुन ५००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

४) शेतीचे वादा वरुन संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्यापीटण्याची धमकी दिली. . :–

दिनांक ११/०३/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे रिस्तेदार असुन शेतीचे वादा वरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन आरोपी क्र. १ ने काठी ने फिर्यादीस मारुन व मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२३,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

५) एसटी चालकांने निष्काळजीपणामुळे पायी चालक गंभिर जखमी . :–

दिनांक १२/०३/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील जखमी अभिषेक जयप्रकाश सिंह वय २६ वर्ष, रा. संभलपुर जि. आजमगड(यु. पी) हा एनएच ०६ रोड ओलांडीत असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील एसटी बस बेदरकारपने व निष्काळजीपने चालवुन अभिषेक यास मानेगाव सडक एनएच ०६ रोड जनसुवीधा केंद्र जवळ येथे धडक मारुन त्यास गंभीर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी राजन जिवतु सींह वय २९ वर्ष, रा. आजमगड (उ.प्र) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३८ भादंवि. अन्वये सहकलम १८४ मोवाका गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०३/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी लतेश प्रेमलाल बागडे वय ३२ वर्ष, न्यु रजनी नगर खात रोड भंडारा याचे मावशीचे घरी आरोपी हा राहत असुन वारंवार भांडण करीत असतांना यातील फिर्यादी हा खोली खाली करण्यास आरोपीस सांगितले असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस आळजातीचे काठीने डोक्यावर, हातावर, पायावर मारुन जखमी केले व शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन मास विक्री करतांना व गोहत्या साहीत्य मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०३/२०१७ चे ११.१५ ते १३.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन स्व:तचे आर्थीक फायदया करीता बेकायदेशीर रित्या गोहत्या करुन मास विक्री करतांनी मिळुन आल्याने त्याचे पासुन नगदी ७९५/–रु., ०२लोखंडी सत्तुर, ०२ लोखंडी सुरी, निळया लाल रंगाच्या चार नॉयालॅन रस्सी, १ लाकडी कुंदा, ०८ किलो मास, काळया रंगाचे ०२ पालीथीन पिशवी चे पाकीट, वजन आणि मोजमाप करण्याचा काटा, एकुण ०६ नग गारे, ०१ नग गोरी, तसेच चारचाकी वाहन क्र. एमएच ३६/०६५६ एकुण किंमत २,५२,१३५/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. घुसर यांचे माहीती नुसार पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५(क),६,९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १२/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, मोहाडी, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, आंधळगाव, गोबरवाही, साकोली, लाखणी, पवनी, अडयाळ, व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ३२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २६८ लिटर हातभटटी दारु + ६० किलो मोटार सायकल साहीत्य किंमती २१,९००/–रु. तसेच २२ लिटर ९८० मिली लिटर देशी + विदेशी किंमती ६६५५/–रु. व जुगारातुन किंमती ८३०/–रू. असा एकुण किंमती २९,३८५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.